# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६**

## नियोजन विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: ओ-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २५१५, इतर ग्रामीण विकास कार्यक्रम**<br>**रूपये:- २,०३,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१) | १२०३ | १० | मी उमरेड विधानसभा मतदारसंघ अंतर्गत कुही तालुक्यातील म्हसली या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंबंधी अत्यंत महत्त्वाचा प्रश्न सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.मसली व परिसरातील अनेक गावांमधील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी त्या ठिकाणी क्लस्टर शाळा उभारण्याचा प्रस्ताव प्रशासनाने तयार करून पाठविला आहे. या शाळेच्या उभारणीसाठी मी माझ्या आमदार स्थानिक विकास निधीतून सुमारे ३ ते ३.५ कोटी रुपये खर्च करण्याची तयारी दर्शविली आहे. परंतु सध्याच्या शासनाच्या नियमांनुसार आमदार स्थानिक विकास निधीतून एका प्रकल्पासाठी केवळ ५० लाख रुपयांपर्यंतच निधी देण्याची मर्यादा आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या शैक्षणिक प्रकल्पासाठी निधी देताना अडचणी निर्माण होत आहेत.या संदर्भात नागपूर जिल्हाधिकारी कार्यालय यांनी विशेष बाब म्हणून प्रस्ताव विशेष भाग तक्ता नियोजन विभागाकडे पाठविला आहे; परंतु अद्याप त्यास मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या हिताचा हा महत्त्वाचा प्रकल्प प्रलंबित आहे.ग्रामीण व दुर्गम भागातील विकासकामे मोठ्या प्रमाणावर करण्यासाठी आमदारांना अधिक निधी देण्याची आवश्यकता आहे. सध्याची ५० लाख रुपयांची मर्यादा मोठ्या विकास प्रकल्पांसाठी अपुरी ठरत आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: ओ-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३४५१, सचिवालयीन-आर्थिक सेवा**<br>**रूपये:- ४,९९,५३,९०,०००/-**<br>**श्री. संजय देरकर** |
| (२) | ११४८ | १०० | केंद्र शासनाने राज्यातील चार जिल्हे आकांक्षित जिल्हे म्हणून घोषित करणे, या आकांक्षित जिल्ह्यात आरोग्य, शिक्षण, सिंचन, रोजगार निर्मिती इतर भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे, संबंधीचा उल्लेख असणे, याच उद्देशाने वाशिम |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जिल्ह्यातील विविध विभागाने राज्य शासनाकडे आपले प्रस्तावाच्या माध्यमातून निधीची मागणी करणे, परंतु अद्याप त्यात प्रस्तावाच्या माध्यमातून जिल्ह्याचा विकास न होणे, त्यामधून अनेक प्रकल्प विकास कामे शिक्षण आरोग्याच्या सुविधा अपुऱ्या असणे, याबाबत लोकप्रतिनिधी यांनी वाशिम जिल्हाधिकारी व सर्व विभागांना आकांक्षित जिल्ह्याच्या विकासासाठी विशेष कृती आराखडा (प्रोग्राम) तयार करून शासनास प्रस्ताव पाठवणे बाबत दिनांक १३/१२/२०२५ पत्रव्यवहार करणे, त्याच पत्राच्या अनुषंगाने वाशिमच्या नियोजन विभागाने १४ /०१ /२०२६ रोजी सर्वच विभागांना पत्र व्यवहार करणे, त्या पत्राच्या अनुषंगाने जिल्ह्याच्या विकासाचे प्रस्ताव तयार करणे, पत्रव्यवहार होणे, सदर प्रस्तावाचे अनुषंगाने केंद्र शासनास राज्य शासनाने नीती आयोगाकडे निधी मिळणे बाबत पत्रव्यवहार व शिफारस करणे, राज्यातील सर्वच आकांक्षित जिल्हाचा विकासा साठी केंद्र शासनाकडे पत्र व्यवहार करण्याबाबत शासनाने करावायची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १० मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) नियोजन विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई